## भाग 2 रा

## बृहन्मुंबई महानगरपालिका
## डॉ. रु.न.कूपर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, जुहू
## मुंबई 400 056

मुंबई महानगरपालिकेच्या  वतीने ज्यासेवा मुंबईच्या नागरीकांना पुरविल्या जातात त्यापैकी वैद्यकीय सहायय ही सेवा पुरविण्यात येते. उपनगरीय नागरीकांना वैद्यकीय सहायय ही सेवा पुरविण्याकरिता मुंबई महानगरपालिकेने 16 उपनगरीय रुग्णालये उपनगरात वेगवेगळया भागात स्थापन केलेली आहेत. डॉ. रु.न.कूपर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय,हे या उपनगरीय रुग्णांलयांपैकी एक असून ते पश्चिम उपनगरातील जुहू विलेपार्ले येथे स्थापन झाले आहे.

पश्चिम उपनगरातील सर्व नागरीकांना आवश्यक त्या सर्व प्रकारच्या द्वितीय स्तर संदर्भ आरोग्य सेवा पुरविणे हे या रुग्णालयाचे ध्येय आहे.

मागील शतकाच्या सातव्या दशकापर्यंत पश्चिम उपनगरामध्ये वांदे ते दहिसर या भागात नागरी किंवा सरकारी रुग्णालय नव्हते.

मुंबई महानगरपालिकेने  इर्ला विलेपार्ले (पश्चिम) येथे भुखंड प्राप्त करुन प्रसुतीगृह स्त्रीरोग चिकित्सा विभागासह दि. 20 फेब्रुवारी 1969 मध्ये पहिली सुरुवात केली.

हे प्रसुतीगुह 1970 मध्ये एका सर्वसाधारण रुग्णालयात परीवर्तीत करुन तेथे बाहयरुग्ण विभाग सुरु करण्यात आला.

दि. 19.10.1970 पासून वैद्यकीय, शल्यचिकित्सा, क्ष-किरण छायाचित्र आणि प्रयोगशाळा हे विभाग सुरु करण्यात आले. त्यांनतर आणखी काही सुविधांमध्येवाढ करण्यात आली आणि आज डॉ. रु.न.कूपर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय,हे सर्व विशेष चिकित्सा सेवांसह 520 खाटांचे प्रमुख उपनगरीय रुग्णालयांपैकी एक बनले आहे.

**पुरविण्यात येणा-या सेवा :-**

**वैद्यकीय :-**

**सर्वसाधारण :-**

**बाहय रुग्ण विभाग व आंतर-रुग्ण विभागातील सेवा :**

1. वैद्यकीय चिकित्सा 2. शल्यचिकित्सा 3. स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र चिकित्सा

4. बाहयरुग्ण चिकित्सा 5.अस्थीव्यंग चिकित्सा 6. नेत्र चिकित्सा

7.नाक-कान-घसा चिकित्सा 8. चर्मरोग व गुप्त रोग चिकित्सा

9. मनोरुग्ण चिकित्सा 10. त्वचा रोपण शल्य चिकित्सा

11. दंतरोग चिकित्सा 12. क्षयरोग व छातीचे रोग चिकित्सा 13. भूलशात्र चिकित्सा

- जेष्ठ नागरीक तपासणी विभाग
- होमियोपथिक विभाग
- कुंटुंब कल्याण विभाग
- लसीकरण विभाग
- भौतिक चिकित्सा विभाग आणि
- विकृतिशात्र चिकित्सा
- क्ष-किरण चिकित्सा
- श्वानदंश लसीकरण विभाग
- शत्रक्रियागृहे

**विशेष सेवा :-**

- अपघात विभाग
- अतिदक्षता विभाग -वैद्यकीय
- अतिदक्षता विभाग- शल्य व अस्थीव्यंग शल्य चिकित्सा
- नेत्र पेढी
- रक्त पेढी
- अकाली जन्म -अर्भक विभाग

- पथ्य आहार विभाग
- शालेय चिकित्सा विभाग
- ऐच्छिक रक्त तपासणी केंद
- दक्ष रक्षक पाहणी केंद
- मस्तिष्क विद्युतालेख विभाग

**इतर सेवा :-**

- àदयस्पंदनालेख विभाग
- औषधनिर्मिती-औषध भांडार व औषध वितरण विभाग
- रुग्णवाहिनी सेवा
- शववाहिनी सेवा
- रुग्णालयीन मुदपाकखाना

**प्रशिक्षण :-**

- पदवीपूर्व प्रशिक्षण
- पदव्युत्तर प्रशिक्षण( वैद्यकीय )
- परिचारीका शिक्षण संस्था
- वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान प्रशिक्षण
- रुग्णालयीन प्रशासकीय प्रशिक्षण
- निरीक्षण नेमणूक- विविध विशेष चिकित्सा सेवा
- वैद्यकीय गंथालय

या वैद्यकीय सेवा कायदे व ठरावाप्रमाणे असाव्या अशी नागरीकांच्या प्रतिनिधींची अपेक्षा असते. त्याप्रमाणे मुंबई महानगरपालिका रुग्णांना चांगले उपचार व रुग्णांची सोईस्करता लक्षात घेते.

महानगरपालिकेच्या सेवेविषयी आपली मते त्याचप्रमाणे काही त्रुटी असल्यास त्याविषयीच मते मांडण्यासाठी व्यवस्था आहे. नागरीकांचे प्रतिनिधी त्यासाठी तक्रार तसेच सुचना पेटीचा वापर करु शकतात.

नागरीकांचे प्रतिनिधी निरनिराळया विभागाच्या खाते प्रमुखांना तसेच समाज विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधू शकतात.

ते कामावर असलेले वैद्यकीय अधिकारी, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी , उपवैद्यकीय अधिक्षक तसेच वैद्यकीय अधिक्षक यांना भेटू शकतात.